## 5. नैसर्गिक वनस्पती व प्राणी:

**ब्राझील – वनस्पती :**

भूरचनेमुळे ब्राझीलच्या पर्जन्यात फरक पडतो. विषुववृत्तीय प्रदेशात बहुतांश भागात वर्षभर पाऊस असतो. विषुववृत्तापासून जसजसे दूर जावे तसतसे पर्जन्यमान, वर्षदिनांचा कालावधी कमी होत जातो. त्यामुळे तेथील वनस्पतीचा जीवनकाळ ही कमी कमी होत जातो. तेथे वर्षभर पाऊस असतो तेथे सदाहरित वने आढळतात. ज्या प्रदेशात पाऊस ठरावीक काळात पडतो. त्या ठिकाणी वृक्षांची घनता कमी होत जाते. वृक्षांऐवजी गवत, खुरटी, काटेरी वनस्पती, झुडपे इ.आढळतात. ब्राझील मध्ये सदाहरित, निमसदाहरित, शुष्क इ . वनस्पती आहेत. पाऊ ब्रासील, रबर, महोगनी, रोझवुड हे वृक्ष आमर (ऑर्किड) या वनस्पतींच्या अनेक प्रजाती आहेत.

सदाहरित वर्षावनांमुळे तेथे प्राणवायू भरपूर प्रमाणात मिळतो. कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण कमी असते म्हणून या वर्षावनांना 'जगाची फुफ्फुसे' म्हणतात.

**भारत - वनस्पती :-** भारतात 2000 मिलिमीटर पेक्षा जास्त पर्जन्य, भरपूर सूर्यप्रकाश असलेल्या भागात सदाहरित वने म्हणतात. या वृक्षांची पाने रुंद व हिरवीगार असून, लाकूड जाड जड व वर्षावनांना टिकाऊ असते. उदा. महोगनी, शिसव, खैर येथे अनेक प्रकारच्या वेली असून, जैवविविधता आढळते. भारतात १००० ते २००० मिमी पर्जन्याच्या प्रदेशात पानझडीची वने आढळतात. कोरड्या ऋतूत बाष्पीभवनाने पाणी कमी न होण्यासाठी पाने गळतात. उदा :-साग, बांबू, वड, पिंपळ.

भारतात जिथे दीर्घकाळ कोरडा उन्हाळा व 500 मिलीमीटर पेक्षा कमी पर्जन्य असते तेथे काटेरी व झुडुपी वने आढळतात. वनस्पतींची पाने आकाराने लहान असतात.

उदा :- खैर, बाभूळ, खेजडी, कोरफड, निवडुंग.

किनाऱ्यालगत दलदलीच्या प्रदेशात, खाड्या व खाजणांच्या ठिकाणी क्षारयुक्त मृदा व दमट हवामान असते. तेथे समुद्रकाठची वने आढळतात. त्यांना सुंदरीची वने व खारफुटीची वने म्हणतात. यांचे लाकूड, तेलकट, हलके व टिकाऊ असते.

**भारतीय हिमालयात उंचीनुसार वनांची तीन प्रकार पडतात -**

1) अतिउंच प्रदेशात हंगामी फुलझाडे असणारी वने.

2) मध्यम उंचीवरील प्रदेशात पाइन, देवदार, फर इत्यादी सुचिपर्णी वृक्षांची वने आढळतात.

3) पायथ्यालगत असलेल्या प्रदेशात मिश्र वने आणि सुचिपर्णी, पानझडी वृक्ष आढळतात. तेथे साल वृक्षांचे प्रमाण जास्त आहे.

**ब्राझील- वन्यजीवन:-** वन्यजीवनात विविधता आहे. पॅटानल या दलदलीच्या प्रदेशात ॲनाकोंडा आढळतात. तेथे मोठे गिनीपिग, मगरी, सुसरी, माकड,प्युमा, बिबट्या इत्यादी प्राणी आढळतात. समुद्रात स्वार्डफिश, नदीत पिऱ्हाना व डॉल्फिन हे  मासे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. कोंडोर हा उंचावर उडणारा मोठ्या आकाराचा पक्षी विविध प्रकारचे पोपट, मकाव, फ्लेमिंगो  हे पक्षी अनेक प्रकारचे कीटक आढळतात.  येथील वन्यजीव समृद्ध आहे.  वन्यप्राण्यांची तस्करी, स्थलांतरित शेती प्रदूषण, निर्वनीकरण इत्यादी मुळे पर्यावरणाचा नाश होतो आहे  व तेथील वन्यप्राणी नष्ट होत आहे.

**भारत वन्यजीवन :-** वन्यजीवांच्या बाबतीत भारतातही प्रचंड विविधता आढळते.  भारतात उष्ण आर्द्र वनांत हत्ती, आसामच्या दलदलीच्या प्रदेशात एकशिंगी गेंडा,  वाळवंटी प्रदेशात रानटी गाढव,  उंट , हिमालयातील बर्फाळ प्रदेशात हिमचित्ते,  याक,  द्वीपकल्पीय प्रदेशात गवा, हरणे,  काळवीट,  माकडे वाघ, सिंह आढळतात.  नद्या ,खाड्या यांच्या प्रदेशात कासव, मगर,  सुसर आढळतात.  वनात मोर, खंड्या,  तितर,  कबुतरे,  पोपट तर पाणथळ जागी बदक,  बगळे व गवताळ प्रदेशात माळढोक सारखे पक्षी आढळतात.

भारतातही प्रदूषण तस्करी,  निर्वनीकरणांमुळे वन्यप्राण्यांच्या प्रजाती नष्ट होत आहेत.  वन्यप्राण्यांचे संरक्षण व संवर्धन होण्यासाठी भारत सरकारने अनेक अभयारण्ये, उद्याने,  राखीव वने निर्माण केली आहेत.